आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ६.४५ वाजता

१४ ऑगस्ट २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू थोड्याच वेळात देशवासियांना संबोधित करणार
- देशभरात उद्या ७८वा स्वातंत्र्य दिन साजरा होणार, नवी दिल्लीत लाल किल्ला इथं प्रधानमंत्री नरेंद मोदी यांच्या हस्ते ध्वजारोहण
- घरोघरी तिरंगा मोहिमेनिमित्त उत्साहाचं वातावरण, राज्यभरात तिरंगा यात्रांमध्ये नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग
- स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर १ हजार ३७ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकांची घोषणा

**आणि**

- सांस्कृतिक कार्य विभागाचे चित्रपट सृष्टीसाठीचे जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम आणि अभिनेत्री आशा पारेख यांना जाहीर

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशवासियांना संबोधित करणार आहेत. आकाशवाणीच्या देशभरातल्या सर्व केंद्रांवरुन तसंच दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून संध्याकाळी ७ वाजता हे भाषण आधी हिंदी आणि त्यानंतर इंग्रजी भाषेत प्रसारित केलं जाईल. त्यानंतर दूरदर्शनच्या प्रादेशिक वाहिन्यांवरून प्रादेशिक भाषांमध्ये राष्ट्रपतींचं भाषण प्रसारित होईल. आज रात्री साडे नऊ वाजता हे संबोधन आकाशवाणीवरुन प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित केलं जाईल. यामुळं आकाशवाणी मुंबई केंद्रावरुन प्रसारित होणार अर्थविशेष हा कार्यक्रम रात्री साडे ८ वाजता प्रसारित होईल.

**<><><><><>**

उद्या देशभरात ७८वा स्वातंत्र्य दिन साजरा होणार आहे. उद्या दिल्लीतल्या लाल किल्ला इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ध्वजारोहण असून त्याच्या ऐतिहासिक तटबंदीवरून ते देशाला संबोधित करतील. यंदाच्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याची संकल्पना विकसित भारत अशी आहे. स्वातंत्र्य दिन सोहळ्यात सहभागी होण्यासाठी केंद्र सरकारने देशभरातल्या विशेष पाहुण्यांना आमंत्रित केलं आहे. यामध्ये महाराष्ट्रातल्या १२३हून अधिक व्यक्तिंचा समावेश आहे. यात विशेष आमंत्रितांसह महिला, युवक, शेतकरी, आदिवासी, क्षेत्रीय अधिकारी आणि विविध सरकारी योजनांचे लाभार्थी, MyGov स्वातंत्र्य दिन प्रश्नमंजुषेचे विजेते आणि नीति आयोगाच्या विशेष आमंत्रितांसह समाजातल्या विविध घटकांचा समावेश असेल.

ध्वजारोहण समारंभाचं थेट प्रक्षेपण आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रावरून सकाळी सात वाजता प्रसारित होईल. त्यानंतर देशभरातल्या विविध प्रादेशिक आकाशवाणी केंद्रांवरूनही या सोहळ्याचं प्रसारण होईल. आकाशवाणी एआयआर या अधिकृत यूट्यूब वाहिनीवरूनही त्याचं थेट प्रक्षेपण होईल. या भाषणाचं प्रादेशिक भाषांमधल्या आवृत्तीचं प्रसारण त्याच दिवशी रात्री साडे नऊ वाजता प्रादेशिक केंद्रावरून प्रसारित होईल.

**<><><><><>**

हर घर तिरंगा अभियानांतर्गत आज **नवी मुंबई**तल्या विविध भागात तिरंगा यात्रा काढण्यात आल्या होत्या. या यात्रांमध्ये विद्यार्थी, महिला, युवक तसंच नागरिकांसह सायकलपटूही मोठ्या संख्यने सहभागी झाले होते.

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर आज **नाशिक** महापालिकेनं तिरंगा पदयात्रा आयोजित केली होती. या पदयात्रेदरम्यान स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांचा सत्कार करण्यासह हुतात्मा स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करण्यात आलं. स्वातंत्र्य दिनाच्या

दिवशी प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज फडकवण्याचं आवाहन नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या पदयात्रेदरम्यान केलं.

**परभणी** शहर महानगर पालिका, महसूल प्रशासन, पोलीस प्रशासन आणि शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमानं आज परभणी शहरात तिरंगा रॅली काढण्यात आली होती. या रॅलीदरम्यान देशभक्तीपर गीतं वाजवून पोलीस बँड पथकानं सगळ्यांची मनं जिंकली.

**अहमदनगर** जिल्ह्यातही घरोघरी तिरंगा मोहीम राबवली जात आहे. त्यानिमित्त अहमदनगर महापालिकेनं आज तिथल्या भुईकोट किल्ला मैदानावर तिरंगा दौडचं आयोजन केलं होतं.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी अभिनेते अजिंक्य देव म्हणाले…

**होल्ड--बाईट - अजिंक्य देव**

**<><><><><>**

मुंबईकरांचे आयुष्य सुलभ करण्यासाठी विविध योजनांना गती दिली जाणार आहे. त्याअंतर्गत कांदिवलीत 37 एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल उभारण्याचा प्रकल्पाला लवकरच वेग येणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली. लवकरच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठीच्या खेळाडूंना याठिकाणी मार्गदर्शन दिले जाईल, असं ते म्हणाले. मुंबईतल्या विविध प्राधिकरणांच्या प्रमुखांसोबत झालेल्या बैठकीनंतर ते

बोलत होते. पश्चिम दृतगती मार्गावर आकुर्लीतला भूयारी मार्ग ऑगस्ट अखेर पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळं याठिकाणची वाहतूक कोंडीची समस्या दूर व्हायला मदत होईल, असं ते म्हणाले. मुंबईत इतरही ज्याठिकाणी वाहतूक कोंडी होते तिथे अधिक वाहतूक पोलीस नियुक्त करुन वाहतूक सुरळीत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मुंबईतल्या वाहतुकीच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी टाटा समुहाच्या मदतीनं सार्वजनिक खासगी भागिदारीतून काही मार्ग काढता येतात का यावरची चर्चा सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. मुंबईतले प्रलंबित प्रकल्प झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण स्थानिकांच्या मदतीनं विविध पर्यायांचा विचार करुन पूर्ण केले जातील असं आश्वासन त्यांनी दिलं. ‘एक पेड माँ के नाम’ अभियानाच्या अंतर्गत उत्तर मुंबईत १ लाख झाडं लावली जाणार आहेत. ही झाडं विद्यार्थी दत्तक घेणार असल्याची माहिती त्यांनी दिली. कांदिवली आणि शिंपोलीमधलं कौशल्य विकास केंद्र लवकरच कार्यरत होईल, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस, अग्निशमन, होमगार्ड, नागरी सुरक्षा आणि सुधारणा सेवेच्या एकंदर १ हजार ३७ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकांची घोषणा करण्यात आली आहे. तेलंगण पोलीस दलाचे मुख्य कॉन्स्टेबल चडूवू यादय्या यांना राष्ट्रपती शौर्यपदक जाहीर झालं आहे. २१३ कर्मचाऱ्यांना शौर्यपदक, तर ९४ जणांना विशेष सेवेसाठी राष्ट्रपती पदकानं सन्मानित करण्यात येत आहे. यापैकी ७५ कर्मचारी पोलीस सेवेतले, ८ अग्निशमन सेवेतले, ८ नागरी सुरक्षा आणि होम गार्ड सेवेतले, तर ३ सुधारणा सेवेतले कर्मचारी आहेत. यामध्ये राज्यातल्या चिरंजीव राम छेबीला प्रसाद, राजेंद्र डहाळे, सतीश गोवेकर यांचा समावेश आहे. ७२९ जणांना प्रशंसनीय सेवेसाठी पदकं जाहीर झाली आहेत. यात महाराष्ट्रातल्या विविध सेवांमध्ये कार्यरत असलेल्या ५९ कर्मचाऱ्यांचा समावेश

आहे. भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी, अतिरिक्त पोलीस महानिरीक्षक अनुज तारे यांना शौर्यपदक जाहीर झालं आहे. तर अतिरिक्त महासंचालक चिरंजीव प्रसाद, संचालक राजेंद्र डहाळे आणि सहायक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर यांना परमसेवा पदकानं सन्मानित करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीनं चित्रपट सृष्टीसाठीच्या पुरस्कारांची घोषणा आज सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांना जाहीर झाला आहे. तर राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना जाहीर झाला आहे.

चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार लेखक, दिग्दर्शक तसेच अभिनेता दिग्पाल लांजेकर यांना जाहीर झाला आहे. तर राज कपूर विशेष योगदान पुरस्कार जेष्ठ लेखक, दिग्दर्शक संकलक एन.चंद्रा यांना जाहीर झाला आहे.

**<><><><><>**

वाशिम जिल्ह्याच्या विविध भागातल्या नागरिकांनी विविध मागण्यांसाठी आजपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणे सुरु केली आहेत. उपोषणकर्त्या नागरिकांनी उभारलेल्या तंबूमुळे जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर गजबजला आहे.

**<><><><><>**

सर्वसामान्य लोकांच्या अडी-अडचणींचं निवारण करण्याच्या उद्देशानं सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी सिंधुदुर्गमधल्या नियोजन सभागृहात आज सावंतवाडी साठी जनता दरबार घेतला.

<><><><><>

कोलकाता इथल्या महिला डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणाचा तपास सीबीआय कडं सोपवण्याचे आदेश काल उच्च न्यायालयाने दिल्यानंतर निवासी डॉक्टरांच्या राष्ट्रीय संघटना फोर्डा ने देशव्यापी संप मागे घेतला आहे. मुंबईत मार्डने पुकारलेला संप आजही सुरुच असून मुंबईतल्या केईएम, सायन आणि नायर सारख्या रुग्णालयात डॉक्टर कामावर नाहीत. आपत्कालीन सेवा मात्र सुरुच ठेवल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

<><><><><>

अर्थात एनआयआरएफ अर्थात राष्ट्रीय संस्थात्मक मानांकन आराखड्याच्या सर्वांगीण यादीत भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबईला मिळालेलं तिसरं मानांकन मिळण्यात अभियांत्रिकी, नवनिर्मिती, विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर क्षेत्रातल्या चांगल्या कामगिरीचा मोठा हातभार असल्याचं प्रतिपादन आयआयटी मुंबईचे उपसंचालक प्राध्यापक मिलिंद अत्रे यांनी केलं.

<><><><><>

राज्याच्या दक्षिण मध्य भागात आणि मराठवाड्यातल्या काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><>//